# साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्कारासाठी आवाहन

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

साहित्य अकादमीतर्फे दरवर्षी मान्यताप्राप्त २४ भारतीय भाषांमध्ये साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार प्रदान केले जातात. भारतीय अनुवादकांनी अनुवादित केलेल्या उल्लेखनीय ग्रंथांसाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी मराठी भाषेतील लेखक, प्रकाशक, अनुवादक यांच्याकडून प्रवेशिका मागवण्यात आल्या आहेत.

भारतीय भाषांमध्ये मराठीसोबच आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती आदी भाषांचाही समावेश करण्यात येतो. २०२५ या वर्षासाठीच्या या पुरस्कारांसाठी १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत प्रकाशित झालेली पुस्तके पाठवणे अपेक्षित आहे. हे प्रथम प्रकाशन असणे आवश्यक आहे. ५० हजार रुपये रोख आणि ताम्रपट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ३१ मे २०२५ पर्यंत या पुरस्कारासाठी अर्ज करावेत. याचे नियम साहित्य अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.